ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 7 | MARCH - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# "परिसरूपी व्यक्तीम्हत्त्व गुरुवर्य डॉ. रविकिरण जाधव सर"



**डॉ. ज्योतीराम द. देशमुख**
**सहाय्यक प्राध्यापक**
**इतिहस विभाग मॉडर्न कॉलेज, शिवाजी नगर पुणे.**

## प्रस्तावना :

प्राचीन भारतीय परंपरेनुसार आई-वडिलांनंतर गुरूचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. गुरुमुळेच मानवी जीवनाचा उद्धार होऊ शकतो अशी संकल्पना वेगवेगळ्या प्राचीन ग्रंथातुन दिसून येते. तेव्हा आम्हा सर्व विध्यार्थ्यांना लाभलेले गुरु म्हणजे गुरुवर्य डॉ. रविकिरण जाधव सर होय ......!

या चालू वर्षी ३१ मार्च २०२५ रोजी आम्हा सर्व विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक गुरुवर्य डॉ. रविकिरण जाधव सर, दयानंद कॉलेज सोलापूर, येथून सेवानिवृत्त होत आहेत, त्यानिमित्त सरानसोबतच्या आठवणीचा उजळा.........!

मागील २० वर्षाच्या काळातील सरांसोबतच्या आठवणींना उजाळा देताना आज अगदी मनात विचारांची गर्दी होत आहे. मागील अनेक प्रसंग आठवत मी पुन्हा भूतकाळात शिरत आहे. खरे तर माझा आणि सरांचा परिचय प्रथम झाला तो म्हणजे जुलै २००५ साली. या वर्षी जुलै महिन्यात मी पूर्वीचे सोलापूर विद्यापीठ व अत्ताचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, येथे "प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्तत्व" या विषयात एम. ए. साठी प्रवेश घेणेसाठी चौकशी करण्यास गेलो होतो, तेव्हा "प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्तत्व" या विभागात सरांचा परिचय झाला., आणि नंतर रितसर प्रवेश परीक्षा देवून एम.ए. ला प्रवेश घेतला. प्रवेश घेतानाच सरांनी बजावून संगितले होते कि, "तुला बी.ए. ला खूप कमी मार्क आहेत त्यामुळे एम. ए. साठी नियमित लेक्चरला यावे लागेल तसेच खूप अभ्यास करावा लागेल, चांगले मार्क मिळाले तरच तुझे पुढे काहीतरी होईल"!

याएम ए. च्या दोन्हीवर्षी (२००५-०६ ते २००६-२००७), मी नियमित विद्यापीठात सर्व प्राध्यापकांच्या तासाला उपस्थित रहात असे. येथे प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्तत्व हा विषय माझ्यासाठी नवीनच होता आणि येथे वेगवेगळे विषय शिकविणेसाठी वेगवेगळे प्राध्यापक होते. प्रामुख्याने डॉ. सोपान जावळे, डॉ. चंद्रकांत चव्हाण, डॉ. राजाभाऊ लोखंडे,डॉ. सुहास निंबाळकर, डॉ. के. टी. पाटील, प्राध्यापिका कै. वैजयंती नाईकनवरे प्राध्यापिका डॉ. लता आकलूजकर, डॉ. अर्चना कोकाटे, डॉ. सुजाता शास्त्री, डॉ. कुलकर्णी आणि डॉ. सावंत मॅडम हे सर्व प्राध्यापक होत. याच बरोबर डॉ. प्रभाकर कोळेकर,डॉ. संजय गायकवड,डॉ. जैनुद्दीन पटेल यासह इतर काही प्राध्यापकांशी माझा परिचय जाधव सारांमुळे झाला. विध्यापीठातील या सर्व प्राध्यापकांची शिकविण्याची वेगवेगळी पद्धत होती. एकंदरीत सर्वच शिकविलेले समजत असे.

डॉ. जाधव सरांची शिकविण्याची पद्धत ही एकदम साधी आणि सोप्या शैलीत विद्यार्थ्यांना समजेल अशी आहे. त्यामुळे सरांनकडून प्रागेतिहास, अश्मयुगिन मानव, प्राचीन लिपी(ब्रह्मी, खारोष्टी) तसेच पुरातत्वीय उत्तखनन आणि पुरतत्वीय अवशेषांची नोंदणी इत्यादी विषय शिकताना वेगळीच मजा यायची आणि तेवढेच या विषयांचे कुतूहलही वाटायचे कारण हे सर्व विषय माझ्यासाठी नवीनच

होते. माला सरांनबरोबर वेगवेगळ्या अभ्यास सहलीतूनही खूप शिकयला मिळाले. यामध्ये कुडलसंगम येथील मंदिर अभ्यास सहल आणि विश्व पर्यटन सप्ताह दिवस, डेक्कन कॉलेज आयोजित जुन्नर येथील पुरातत्वीय उत्तखनन आणि परिसरातील लेणी- नाणेघाट अभ्यास, विजापूर येथील गोलघुमट आणि हम्पी आणि पाट्ट द्कल मंदिर बदामी येथील लेणी इत्यादी अभ्यास सहलीतून माला खूप काही शिकता आले. तसेच सोलापूर शहर परिसर जिल्यातील विविध भागत आढळणारी पांढरीची टेकडे, खपरी भांडी, मंदिरे, विविध मुर्त्या, विरगळी, शिलालेख आदि पुरावशेष समजून घेता आले. एकंदरीतच सरांचा ओसंडणारा उत्साह, आम्हां सर्व विध्यार्थ्यांना उत्साही बनवायचा. सहलींच्या माध्यमातून सरांनी आम्हांला पुरातत्तत्वीय अभ्यासाच्या जवळ न्हेले आणि ऐतिहासिक, सांस्कृतिकमाहिती सांगून या विषयाची गोडी आम्हाला लावली. तसेच आमच्या अनेक शंकांच निरसन करून नि आमचं अज्ञान दूर केले. याचबरोबर पुरात्तत्त्वया विषयातील नवप्रकाशाची कवाडे आम्हाला सतत उघडी करून दिली.

यामुळे माला वर्गातील अभ्यासापेक्षाही गाव-परिसरात फिरून पुरावशेष शोधून अभ्यास करायची आवड निर्माण झाली (Field Archaeology). त्यामुळे सुट्टीच्या दिवशी मी बऱ्याचश्या गावात भटकत असे आणि आजही या विषयाच्या अभ्यासासाठी भटकतच आहे,हे केवळ डॉ. जाधव सरांमुळेच. तसेच मी आजही काहीतरी नवीन शिकत आहे.

सरांच्या मार्गदर्शनाखाली आम्हा सर्व विध्यार्थ्यांना सोलापूर इतिहास परिषदेअंतर्गत संशोधनपर शोधनिबंध सादर करणेची संधी मिळाली. यातूनच शोधनिबंध लिहून प्रकाशित करणेची आवड निर्माण झाली. एकंदरीत सरानी एम.ए. ला असतानाच आम्हा सर्व विद्धार्थ्यांना संशोधंनाचे बाळकडू पाजले. त्यामुळे आज माझ्याबरोबरच सरांचे बरेचशे विध्यार्थी पी.एचडी. करू शकले. यातील काही विध्यार्थी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. काही सरकारी अधिकारी तर काही वस्तुसंग्राहलयात नोकरी करतायत. तसेच काही विध्यार्थी स्व-व्यवसाय करतायत.

याचबरोबर सोलापूर विद्यापीठाअंतर्गत दोन वर्ष एन.एस.एस. च्या माध्यमातूनसरांनी आमच्या जीवनात स्वावलंबन, सहकार्य, सामुदायिक जीवन, नेतृत्व या प्रवृत्ती विकक्षित केल्यात.आजच्या वर्तमानाशी संघर्ष करण्याची उमेद आमच्यात आली ती केवळ सर आपल्यामुळेच!

आज जे आम्ही सर्व विध्यार्थी घडलो आहोत आणि आमच्या अनुभवाची जी क्षितिजं उंचावली व रुंदावली ती केवळ डॉ. रविकिरण जाधव सर या शिक्षकरूपी गुरुमुळेच! सरांनी कधीही कोणताही भेदभाव केल्याचे माला तरी जाणवले नाही.

आदरणीय सर, तुमच्या विषयी बोलायचे म्हंटले तर,“*तुम्ही एक हाडाचे शिक्षक अहात, शिक्षण हा तुमचा स्वधर्म आणि विद्यार्थी हेच तुमचं दैवत आहे, कॉलेज- विद्यापीठ हेच तुमचं मंदिर होय आणि या सर्वांसाठीधडपड हीच तुमची दैनंदिन पूजा आहे. दुरितांचे तिमिर जावो ही तुमची प्रार्थना आहे. त्यामुळे तुमच्या जवळ जो कोणी विद्यार्थी येईल त्याच्या आयुष्याचे सोने होते. त्यामुळे सर तुम्ही परिसरूपी गुरु आहात”.* हे मी स्वअनुभवतून सांगतो.आदरनिय सर,शेवटी मी अपणास एवढेच सांगू इछितो हे आपले ऋण या जन्मात तरी फिटेल की नाही हे सांगता येत नाही.

सर आपणास आपल्या सेवानिवृत्ती नंतरच्या भावी कार्यास आणि दिर्घअयुष्यासाठी माझ्याकडून व आम्हा सर्व विद्यार्थ्यांकडून शुभेछा!